(Marathi)

1038
9121


1579

17

P

प्रभातफेरीची

# राष्ट्रीय गीतावली!



लाठीगीत, गांधींची भूपाळी इ. इ.

आवृत्ति ३ री ] [ किं. १ आणा.

IMPERIAL RECORD DEPARTMENT
21 NOV. 1930
1579 Mar
369
1579 Mar

# राष्ट्रसंतांना वंदन !

( चाल:—आनंदकंद— )

या वंदुं राष्ट्रसंतां । त्या थोर भाग्यवंतां ॥ धृ० ॥
ते विश्ववंद्य गांधी । वंदूं तयांस आधीं ॥
हरतील राष्ट्रव्याधी । महिमा सदैव गातां ॥ १ ॥
ते नेहरू पिताश्री । लोळे पदीं स्वतां श्री ॥
गातां मुखें गुणश्री । येईल भाग्य हातां ॥ २ ॥
ज्याचा पिताच मोती । त्या काय होय कमती ॥
अर्पूं जवाहिरा ती । प्रणती सुभावयुक्ता ॥ ३ ॥
ते वल्लभी पटेल । महती जगा पटेल ॥
ज्याच्या हृदीं सखोल । दे शांतिला विधाता ॥ ४ ॥
मदनास लाजवोनी । मोहून टाकी अवनी ॥
त्या मालवीयजींनीं । वेडाविलें अनंता ॥ ५ ॥
या संतपंचकाला । वंदा हि गा यशाला ॥
हें वंद्य विश्वपाला । हो पूर्ण सौख्य दाता ॥ ६ ॥

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1579
Date 18.1.72
GOVT. OF INDIA

# वन्दे मातरम्.

( राग—मिश्र काफी, ताल-त्रिवट. )

वन्दे मातरम्
सुजलां सुफलां मलयजशीतलाम् ।
शस्यश्यामलां मातरम् ॥ वंदे० ॥
शुभ्रज्योत्स्नापुलकितयामिनीम् ।
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम् ॥
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम् ।
सुखदां वरदां मातरम् ॥ वंदे० ॥

---

## लाठीवाला !

( चाल—टोपीवाला पाहुणा...... )

टोपीवाला । आजि बनला लाठीवाला ॥ धृ० ॥
अस्सल बनिया विलायतेचा ।
कवडी दमडी करावयाचा ॥
धनि झाला हिंदुस्थानाचा ।
तागडीवाला । आजि बनला लाठीवाला ॥ १ ॥
फोडुनी झोडा तत्वा वरिलें ।
इंग्रजि राज्या स्थापित केलें ॥
नवे कायदे चालू केले ।
अंमल बसला । आजि बनला लाठीवाला ॥ २ ॥

कांचा देउनि माणिक नेलें ।
इंग्रज सगळे गब्बर केले ॥
हिंदी जन कासाविस झाले ।
जीव भुकेला । अजि बनला लाठीवाला ॥ ३ ॥
उडुनि गेली आतां माया ।
कळुनि आली इंग्रज किमया ॥
स्वातंत्र्याचें ध्येय वराया ।
जन हा सजला । आजि बनला लाठीवाला ॥ ४ ॥
गांधीजींनीं मंत्र कथियला ।
सत्य अहिंसा धर्म उदेला ॥
भीति टाकुनि जन हा सजला ।
संग्रामाला । आजि बनला लाठीवाला ॥ ५ ॥
पाहुनि जनता जागृत झाली ।
बोबडी बनियाची हो वळली ॥
ह्मणे कायहो करुं या वेळीं ।
कोणी बोला ! अजि बनला लाठीवाला ॥ ६ ॥
संतापानें चिडून गेला ।
निःशस्त्रांना हाणित सुटला ॥
स्त्रियामुलांचा भेद न उरला ।
बंबं बोला । अजि बनला लाठीवाला ॥ ७ ॥
बंधुभगिनींनो, ब्रीदा पाळा ।
मंगल सत्याचा जय बोला ॥
अनंतछंदी कवि गहिंवरला ।
प्रेमें धाला । आजि बनला लाठीवाला ॥ ८ ॥

---

# वैष्णव जन त्या बोला !

( महात्माजींचें आवडतें पद. )

वैष्णव जन त्या बोला जन हो ।
दुःख पराचें जो जाणे ॥
परदुःखातें निवारी परि जो ।
चढे वृथा ना अभिमानें ॥ १ ॥

सकलां प्रेमें सदा वंदी जो ।
निंदा न करी कोणाची ॥
कायावाचामनें अचल जो ।
धन्य धन्य जननी त्याची ॥ २ ॥

सुखदुःखीं समदृष्टी ठेवी ।
मानी माता परकांता ॥
असत्य भाषण विषसम मानी ।
कर्दम मानी परवित्ता ॥ ३ ॥

मायामोहां देत न थारा ।
वैराग्यातें जो सेवी ॥
रामनाम गर्जे प्रेमानें ।
ब्रह्मसमाधी जो लावी ॥ ४ ॥

अंतरिं भक्ती कपट न चित्तीं ।
कामक्रोधा स्पर्शे ना ॥
नरसींदासा वंद्य एक तो ।
वंदन भावें तच्चरणा ॥ ५ ॥

---

## आर्यजनहो, मंत्र बोला !

आर्यजनहो, ह्याचि बोला मंत्र वंदे मातरम् ॥
गीतसुंदर श्रुतिमनोहर मंत्र वंदे मातरम् ॥ धृ० ॥
हिंदमाता दु:खिता हो पारतंत्र्यीं गांजली ॥
दु:खमोचन करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ १ ॥
भेदभावां जोर आला ऐक्य सारें लोपलें ॥
ऐक्यवर्धन करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ २ ॥
चित्तशुद्धी लोपतां हो व्यसनिं जन हा गुंगला ॥
व्यसनवारण करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ३ ॥
शक्ती गेली युक्ति गेली दैन्य भारतिं मातलें ॥
दैन्यनाशा करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ४ ॥
मोहमाया परकियांची मानबुद्धी लोपवी ॥
दास्यवृत्ती नाशि ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ५ ॥
एक अपुली हिंदमाता प्यारी प्राणाहुनि असे ॥
धन्य माता करिल ऐसा मंत्र वंदे मातरम् ॥ ६ ॥

---

# चला रे शांतिसंगराला !

( चाल–चला रे गणराया वंदा. )

चला रे शांतिसंगराला ।
कारागृह तें झालें आतां सत्याग्रहशाला ॥ धृ० ॥

नमूं या भारतमातेला ।
सकल सारखीं मुलें लाडकीं भेदभाव नुरला ॥ १ ॥

कोठला धर्मभेद उरला ।
राष्ट्रधर्मबंधन तें पाळुनी सुखवुं आर्यभूला ॥ २ ॥

टाकुं या परकी मालाला ।
घेऊं प्रेमें देशी वस्तू मोह सर्व गेला ॥ ३ ॥

कायदा सत्याचा पाळा ।
सत्यविरोधी इतर कायदे फोलाचि पाचोळा ॥ ४ ॥

धरोनी स्वाभिमानतेला ।
तुडवा पायीं गुलामवृत्ती सर्वनाश झाला ॥ ५ ॥

संकटीं शांतिब्रीद पाळा ।
नाहीं कसली भीति उरली हृदयिं मेरु ठेला ॥ ६ ॥

---

# भूपाळी महात्मा गांधींची.

( चाल–घनश्यामसुंदरा श्रीधरा. )

घनश्याम गोजिरा गांधीजी कारागृहीं गेला ।
उठा लौकरी बंधुभागिनिनों चला संगराला ॥ धृ० ॥
जगांत कोणी नसे पाहिलें, युद्ध सुरू झालें ।
एक पक्ष सजला शस्त्रानें दुसरा शांतिबलें ॥
सत्य बोलणें सत्य चालणें सत्या आचरणें ।
सत्यशस्त्र घेवोनि करीं ते गांधी समरीं गेले ॥
चाल॥ मनीं शांति धरणें सत्यता हेंचि ब्रीद पहिलें ।
क्रोधवृत्ती गिळुनी पाहिजे चित्त शुद्ध केलें ।
तमासि जिंकाया सत्य तें पहा सिद्ध झालें ॥
चाल पू. उदयाचालिं फांकली प्रभा स्वातंत्र्यसूर्य आला ।
उठा लौकरी बंधुभागिनिनों, चला संगराला ॥ १ ॥
चक्र सुदर्शन श्रीविष्णूच्या करिं शोभे साचें ।
त्यानें गांधीकरीं घेतलें रूपाचि चरख्याचें ॥
शुभ्र सुंदरा खादी वापरा देशा उद्धारा ।
विलायती मालावरि घाला आज बहिष्कारा ॥
चाल॥ भेदभाव सोडा अनुसरा राष्ट्रिय धर्माला ।
सत्यव्रत सेवा दयेचा श्रेष्ठ धर्म पाळा ।
स्वराज्य चालोनी येईलहि तुमच्या देशाला ।

चाल पू. धैर्य धरा चित्तीं घालवा नसत्या भीतीला ॥
उठा लौकरी बंधुभगिनिनों, चला संगराला ॥ २ ॥

---

## हरहर महादेव बोला !

राष्ट्रीय झेंडा फडकत आला । हरहर महादेव बोला धृ०

सुंदर मूर्ती स्वातंत्र्याची झेंड्यानें वरिली ।
प्राणाहुनि हा प्यारा झेंडा त्याचा जय बोला ॥ १ ॥

भगवा झेंडा शिवप्रभूनें पूर्वी फडकविला ।
वीर धांवले रक्षायाला आठवा त्या काला ॥ २ ॥

सिंहप्रतापी प्रतापसिंहें झेंडा फडकविला ।
झेंडारक्षण करावयाला लाख वीर मेला ॥ ३ ॥

सत्यधर्म स्वीकारुनि आतां हीन वृत्ति सोडा ।
सत्वधैर्यवीर्यांचा केला झेंडा हा अपुला ॥ ४ ॥

प्रभातकालीं मंगलकालीं वंदा झेंड्याला ।
शांतिसंगरा सिद्ध होउनी तारा देशाला ॥ ५ ॥

हरहर महादेव बोला !

---

# घेऊं, स्वराज्य घेऊं !

( चरखा चला चलाके. )

चरखा फिरून फिरवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ धृ० ॥

नुरली मनांत भीती । सत्यावरीच प्रीती ।
श्रद्धा कसास लावूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ १ ॥

गाऊं स्वदेशगीतें । काढूं सुतास हातें ।
खादीच नित्य लेवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ २ ॥

व्यापार सर्व गेला । परदेश पुष्ट झाला ।
आतां स्वदेशि सेवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ३ ॥

जनताजनार्दनाला । या देशदेवतेला ।
सर्वस्व आज वाहूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ४ ॥

टिळकांनीं हेंच कथिलें । गांधीहि तेंच बोले ।
देशास नित्य ध्याऊं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ५ ॥

कवि हा अनंतछंदी । देशास नित्य वंदी ।
प्रेमें सुगीत गाऊं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ ६ ॥

# मातृभूमिवंदन.

( चाल—अयि मातृभूमि तेरे– )

हे मातृभूमि ! तुझिया चरणींच डोई ठेऊं ।।
प्रेमें तुलाच माते ! सर्वस्व आज वाहूं ।। धृ० ।।

स्वर्गीय गंध तूंहि, स्वर्गीय पुष्प तूंहि ।।
स्वर्गीय गीत तूंहि, तव नाम एक गाऊं ।। १ ।।

ते लोकमान्य गांधी तव पुत्र थोर झाले ।
पदधूलि एक त्यांची शिरिं आपल्याचि लावूं ।। २ ।।

नच भेदभाव मानूं, राष्ट्रीय धर्म वानूं ।।
बांधूनि ऐक्यग्रंथी, प्रेमें स्वदेशि राहूं ।। ३ ।।

राष्ट्रीय गान गाऊं, राष्ट्रीय मान ठेऊं ।।
राष्ट्रीय ध्यान ध्याऊं, राष्ट्रीय ध्येय सेवूं ।। ४ ।।

वंद्यांत वंद्य आहे, हा हिंद देश पाहें ।।
त्यातें स्वतंत्र करुनी, जगतास शांति देऊं ।। ५ ।।

## तो विश्व गांधी !

( चाल—श्रीविश्ववंद्य गणराज. )

तो विश्ववंद्य गांधी । जाहला बंदी ॥ धृ ॥
शांतिबलानें भ्रांति घालवी । जग त्याला वंदी ।
जाहला बंदी ॥ १ ॥
वेडा म्हणतां वेडचि लावी । गुंगे आनंदीं ।
जाहला बंदी ॥ २ ॥
सत्यचि बोले सत्यचि चाले । सत्याचा छंदी ।
जाहला बंदी ॥ ३ ॥
शत्रूलाहि मित्र लेखुनी । उतरवितो धुंदी ॥
जाहला बंदी ॥ ४ ॥
जगीं उपकारापुरता । कसला तो कैदी ॥
जाहला बंदी ॥ ५ ॥

---

## हाच तो सत्याग्रही !

समरास सज्ज झाला । सत्याग्रही निघाला
मोहीम रोखुनीया
रणशूर घेऊनीया

संग्राम झुंजण्याला । सत्याग्रही निघाला ।। १ ।।

सामर्थ्य वर्धवोनी

जगतास चेतवोनी

काळाशीं खेळण्याला । सत्याग्रही निघाला ।। २ ।।

सत्यासमान नाहीं

जगीं वंद्य अन्य कांहीं

पुरुषार्थ प्रेरण्याला । सत्याग्रही निघाला ।। ३ ।।

श्रेष्ठांत श्रेष्ठ थोर

सेनानी क्रांतिकार

स्वातंत्र्य घोषणेला । सत्याग्रही निघाला ।। ४ ।।

आध्यात्म योग भारे

विश्वास जो भरारे

स्वातंत्र्यसेवनाला । सत्याग्रही निघाला ।। ५ ।।

योगींद्र तो महात्मा

जो हिंद देश आत्मा

थरकांपवी जगाला । सत्याग्रही निघाला ।। ६ ।।

यशवंत वीर माझा

विजयी करूनि काजा

हा आश्रमांत यावा । सत्याग्रही निघाला ।। ७ ।।

---

( चालः—माय विठाबाई० ॥ )

झोंप कशी येई । उठ झणीं ॥ धृ० ॥

व्यसनी बनला देश भिकारी ।

अन्न न पोटभरी ॥ उठ० ॥ १ ॥

नकली वस्तू पैसा सारा ।

परदेशा नेई ॥ उठ० ॥ २ ॥

शौर्य लोपलें बुद्धी गेली ।

परदास्या पायीं ॥ उठ० ॥ ३ ॥

सोशित जाचा भारतमाता ।

काशि न दया येई ॥ उठ० ॥ ४ ॥

'मिलिंदमाधव'

---

नव हिंद राष्ट्र झेंडा । प्रणामा घे या ॥ धृ० ॥

हिंद भूमिच्या हिंदि जनांच्या । स्वाभिमान चिन्हां ॥ प्र० ॥

स्वराज्य माझें मीही त्याचा । जगता सांगाया ॥

स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरती । बा फडफडणाऱ्या ॥

हिंदपुत्र हे सिद्ध तुझ्यास्तव । प्राणही अर्पाया ॥

नव्यामनूचे शिलेदार हे । नमिती तुजला या ॥

---

( चालः—पांडवा सम्राट० ॥ )

बंधुभागिनीनो उठा या देश कार्यासी चला ।
दुष्ट ही साम्राज्यशाही धिःकरा ह्मणि हो तिला ॥ धृ० ॥

दास्यवेशीं ही तुम्हाला श्वान बनवी सिंह हो ।
गुलामगिरिचे पाश तोडा मुक्त व्हा शुर वीर हो ॥ १ ॥

अमर झाले शूर, योद्धे, प्राण ज्यांनीं अर्पिले ।
तृणवत् गणुनी पंचप्राणा तंग युद्धीं धांवले ॥ २ ॥

देशकार्यीं प्राण अर्पायास आतां सिद्ध व्हा ।
मोक्ष मिळवायास साचा ' देशसेवा ' मार्ग हा ॥ ३ ॥

देश मारी हांक ओ द्या शुद्ध खादी वापरा ।
माल साचा जो स्वदेशी, नित्य छातीशीं धरा ॥ ४ ॥

गांधीजीचें ध्येय गांठा, कायदेभंगा करा ।
त्यजुनि सारी चैन आतां स्वार्थत्यागासी वरा ॥ ५ ॥

' शांती ' सेवा ' ऐक्य ' साधा ' अनत्याचारी ' बना ।
' देश माझा मीं देशाचा ' मंत्र ह्याचो मुखें म्हणा ॥ ६ ॥

' मिलिंद माधव '

---

( चालः--मेरे मौलाबुला० )

देशा, आम्हीं अतां, चल साह्य करूं ॥ धृ० ॥
राष्ट्रकार्यिं गांधींजिनीं तनमन धन अर्पियलें ।
मनी त्यांसि स्मरूं ॥ चल० ॥ १ ॥
विभुति थोर, थोर जशा चालतात अग्नितुनी ।
तयां अनुसरूं ॥ चल० ॥ २ ॥
परकियांस पोशियलें सोसुनी उपास अम्हीं ।
अतां बंद करूं ॥ चल० ॥ ३ ॥
हिंदमाय बंदिवान या पुढें न पाहुं कुणीं ।
अजि मुक्त करूं ॥ चल० ॥ ४ ॥
( 'मिलिंद माधव' )

---

धन्य गांधीजी तो रणगाजी धन्याचि नेहरूजी ।
प्रेमें आजि स्वातंत्र्याचा पोवाडा गाजी ॥
गांधी नेहरू लढति मिठागरीं स्वातंत्र्यासाठीं ।
लढतां लढतां दोघे पडले शत्रूंच्या हातीं ॥
खादी वापरा व्यसने सोडा स्वातंत्र्या गांठा ।
दारू सोडा कां पितां तो नरकाचा सांठा ॥
उठा मर्द हो प्रभातकालीं निश्चय हाच करा ।
ध्येया गांठा स्वातंत्र्याच्या देशा उद्धारा ॥

---

## येरवड्याला चला !

( चालः—उठा बंधुनों, उठा भगिनिनों. )

येरवडा हें क्षेत्र मजेचें चला पहायाला ।
तेथें गांधी देव शोभला वंदू या त्याला ॥ १ ॥
जवळी ज्याच्या पुण्यग्राम तें शोभत थाटानें ।
पुण्यनाम ज्याचें गाजविलें टिळक लोकमान्यें ॥ २ ॥
प्रयागक्षेत्रीं जैशा वाहति गंगा आणि यमुना ।
मुळा मुठा त्या पावन सरिता वाढविती महिमा ॥३॥
भीती पडली ब्युराक्रसीला पुण्य क्षेत्राची ॥
त्यांनीं केली बंदीशाला चोरांचिलटांची ॥ ४ ॥
परी गांधीजी गेले आतां त्या येरवड्याला ॥
बंदीशाला केली त्यांनीं सत्याग्रहशाला ॥ ५ ॥
राष्ट्रभक्त जे मिळवुं पाहति स्वराज्यमोक्षाला ॥
त्यांनीं जावें तपा कराया त्या येरवड्याला ॥ ६ ॥
अनेक गेले तपोनिधी ते जातिल आणिकही ॥
काय वर्णु महती क्षेत्राची कुंठित मति होई ॥ ७ ॥
तिथें गांधिजी देवस्वरूपें दिसतील बसलेले ॥
चला बंधुनों, चला भगिनिनों, या मंगल वेळे ॥८॥
येरवडा हें क्षेत्र गाजलें, चला पहायाला ॥
गुलामगिरिच्या पापा खंडूं, मिळवुं स्वराज्याला ॥९॥

# महात्मा गांधींची आरती.

——:0:——

जयदेव जयदेव जय गांधीराया ।
खादी ही अवतरली देशा ताराया ॥ धृ० ॥
तुझिया हातीं शोभे चरखा सुंदरसा ।
गरगर फिरुनी मंगल ध्वनि काढी खासा ॥ १ ॥
चरखा नोहे वाटे चक्र सुदर्शन ।
दर्शन सुखकर देईल स्वराज्य आणून ॥ २ ॥
वापरुनीयां खादी देशा उद्धारा ।
स्वातंत्र्या मेळवुनी सुखवा जन सारा ॥ ३ ॥
खादी पवित्र आहे गांधीजी बोले ।
बोले तैसा चाले वंदा पाऊलें ॥ ४ ॥
खादी पुराण वाचा मंगल भावानें ।
भावा देव भुकेला गा खादीस्तवनें । ५ ॥
जयदेव जयदेव जय गांधीराया ।
खादी ही अवतरली देशा ताराया ॥ ६ ॥

# उत्तिष्ठ !

( चालः—परवशता पाश० ॥ )

देशाची हांक आली । आतां उठा बंधुनो ॥धृ० ॥

बहिष्कार घाला सोडा ।
माल तो विदेशी ॥ आतां० ॥
सुलभ मार्ग स्वातंत्र्याचा ।
दुष्ट कानू मोडा ॥ आतां० ॥
राष्ट्रधर्म स्मरुनी चाला ।
शांतिसंगराला ॥ आतां० ॥
अतुल शौर्य आतां अपुलें ।
प्रगट होऊं द्याना ॥ आतां० ॥
दुष्ट बुरुज दास्यत्वाचा ।
खिंड त्यास पाडा ॥ आतां० ॥
सहनशीलता ही अपुली ।
दाखवा जगाला ॥ आतां० ॥

'मिलिंदमाधव'

## हिंदमातेची लाडकी कन्या !



श्रीमती सौ. कमलादेवी.

मुद्रक:—पु. ना. वर्दे, मराठा प्रिंटिंग प्रेस,
लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७.
प्रकाशक:—भा. पां. सामंत, काँट्राक्टर बिल्डिंग
गिरंगांव, मुंबई.